# राष्ट्रीय आरोग्य अभियान

## जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, नांदेड

www.zpnanded.in

## एमपीडब्ल्यु (पुरुष) पदाच्या आक्षेपाबाबत सुचना

१५ वा वित्त आयोगांतर्गत कंत्राटी पदांची ११ महिने कालावधीकरीता वैद्यकिय अधिकारी (एमबीबीएस), स्टाफ नर्स, एमपिडब्ल्यु व प्रयोगशाळा तंत्रज्ञ पदांच्या पदभरतीकरीता दि.२३/०६/२०२२ पर्यंत अर्ज मागविण्यात आलेले आहेत.

प्राप्त अर्जानुसार एमपीडब्ल्यु या पदांच्या उमेदवारांची प्राथमिक स्वरुपाची यादी प्रसिध्द करण्यात येत असुन सदर यादीमध्ये आक्षेप/हरकती असल्यास त्याबाबत लेखी स्वरुपात विनंती अर्ज व पुरावा म्हणुन संबंधित कागदपत्र दि.२२/०९/२०२२ रोजी सायं ५.०० वाजे पर्यंत (सुट्टीचे दिवस वगळुन) आक्षेप/हरकती प्रत्यक्ष राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य विभाग, जि.प.नांदेड या कार्यालयाकडे सादर करावेत. तसेच या कार्यालयामार्फत नजरचुकीने जास्त गुण अथवा माहिती नमुद झाल्यास, ती माहिती संबंधित उमेदवाराने निदर्शनास आणुन न दिल्यास व त्यामुळे उमेदवार पात्र ठरत असल्यास /निवड झाल्यास पदभरतीच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराची निवड रद्द करुन संबंधितावर प्रशासकिय कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

तसेच मा.सहसंचालक (तांत्रिक) रा.आ.अ.मुंबई यांचे पत्र क्र.राआसो/राकाव्य/१५ वा वित्त आयोग/एमपीडब्ल्यु/पदभरती/९५३७५-९६०६६/२०२२ दि.०५/०७/२०२२ चे पत्रानुसार बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (पुरुष) MPW (Male) पदाच्या पदभरती करीता खालील निकषांचा अवलंब करण्याबाबत सचुना आहेत.

१) अठरा वर्षापेक्षा कमी वयाचे नाहीत आणि अडतीस वर्षापेक्षा अधिक वयाचे नाहीत; परंतु राखीव प्रवर्गातील उमेदवारांच्या बाबतीत, उच्च वयोमर्यादा पाच वर्षापर्यंत शिथील करण्यात येईल.

२) विज्ञान शाखेतून उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा किंवा शासनाने तिच्याशी समतुल्य घोषित केलेली इतर कोणतीही परिक्षा उत्तीर्ण केलेली आहेत; आणि

३) विभागाच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र किंवा सार्वजनिक आरोग्य संस्था, नागपूर यांच्याकडुन आरोग्य कर्मचारी पदासाठी निश्चित केलेला निमवैद्यकिय मुलभूत प्रशिक्षण अभ्यासक्रम किंवा आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालयाने मान्यता दिलेल्या स्वच्छता निरिक्षक (सॅनिटरी इन्सपेक्टर) किंवा महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या स्वच्छता निरिक्षक (सॅनिटरी इन्सपेक्टर) किंवा समकक्ष अभ्यासक्रम पुर्ण करुन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

तरी वरील प्रमाणे दिलेल्या मुदतीनंतर प्राप्त होणारे कोणतेही आक्षेप/हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत तसेच तद्नंतर कुणाच्याही आक्षेप/हरकती नाहीत असे गृहीत धरुन पुढील प्रक्रिया करण्यात येईल याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी. सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरीत/-
**जिल्हा आरोग्य अधिकारी,**
**जिल्हा परिषद, नांदेड**